भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

( सकाळ )

जा.क्र.२४२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०४/२०१७

**१) घराचा समोरील दाराचा ताला तोडुन आलमारीतुन सोन्याचे व चांदीच्या दागीण्यांची चोरी . :--**

दिनांक ०१/०४/२०१७ चे १७.३० ते २१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी परमानंद आत्माराम कोटांगले वय ५९ वर्ष, रा. न्यु आशीर्वाद नगर गिरोला हे पत्नी सोबत सायंकाळी १७.३० वा. दरम्यान घरी परत आले असता फिर्यादीचे घराचा समोरील दाराचा कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी सांधुन पाहुण ताला तोडुन आत प्रवेश करुन बेडरुममधील गोदरेज आलमारीचा लॉक तोडुन आलमारीत ठेवलेले ३ नग सोन्याचे लॉकेट वजन १.५ ग्रॅम, २ नग सोन्याच्या अंगठया वजन २.५ ग्रॅम, ४ नग चांदीचे पायल वजन ४ तोळे व नगदी ८,०००/--रु. असा एकुण १६,२५०/-- रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहे.

**२) घराच्या अंगणातील सबमर्सीबल पंप व केबल वायरची चोरी . :--**

दिनांक ०१/०४/२०१७ चे १८.०० ते १८.०० वा. ते ०२/०४/२०१७ चे १०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी अजय हरीचंद्र गाहाने वय ४६ वर्ष, रा. प्रगती कॉलोनी सेंदुरवाफा ह. मु. हनुमान वार्ड वडसा जि. गडचिरोली यांचे सुरु असलेल्या घराचे अंगणातील वॉल कंपाऊड वरुन कोणीतरी अज्ञात चोराने खुल्या अंगणात प्रवेश करुन घराचे खुल्या अंगणातील फाल्कन कंपनीचा ०.७५ एचपी एचबीओएफएफ ७५७६ या नंबरचा सबमर्सीबल पंप किंमती ७,८००/--रु. चा व काळया रंगाचा केबल वायर किंमती १,४७६/--रु. असा एकुण ९,२७६/--रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

**३) संगनमत करुन जागेवर अनाधीकृत प्रवेश करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :--**

दिनांक २९/०३/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी यादोबराव मोडकुजी गणवीर वय ६५ वर्ष, रा. शिवाजी वार्ड साकोली यांच्या मालकीचे शिवाजी वार्ड साकोली येथे भुखंड क्र. ४८ क्षेत्रफळ १२८ चौरस मिटर मध्ये मालकीची जागा आहे तेथे तीनही आरोपीतांनी संगनमत करुन अनाधीकृतपणे प्रवेश करुन फिर्यादीस अश्लिल शब्दात व जातीवाचक शिवीगाळ करुन अपमाणीत केल्याने व जिवानीशी ठार मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४४८,२९४,५०६,३४ भादंवि. सहकलम (१)(आर)(एस)अ.जा.ज.अ.प्र.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास श्री. संख्ये उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संख्ये पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

५) अवैध दारु अड्यांवर धाडी . :—

दिनांक ०२/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, कारधा, तुमसर, सिहोरा, आंधळगाव, गोबरवाही, लाखणी, पवनी व लाखांदुर येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण १५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ८७ लिटर हातभट्टी दारु किंमती ७८७०/—रु. २०५ लिटर ३८० मिली लिटर देशी दारु+ १ मारोती ओमनी + १मोटार सायकल + १६ लिटर ७०० मिली बनावटी दारु वजन + ३ लिटर अल्कोहोल लिक्वीड + १ मोबाईल + साहित्य किंमती २,८५,२९८/—रु. असा एकुण किंमती २,९३,१६८/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.